लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# देशी बनावटीच्या चालकमुक्त मेट्रोची वैशिष्ट्ये काय?

## अश्विनी भिडे यांच्याकडून जाणून घेण्याची संधी, 'लोकसत्ता शहरभान' चे सत्र बुधवारी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेचे काम सध्या वेगात सुरू आहे. तर, या मार्गिकेतील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबरअखेरीस वाहतूक सेवेत दाखल करण्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे (एमएमआरसी) नियोजन आहे. एकीकडे पहिल्या टप्प्याच्या चाचण्याला सुरुवात करण्याचा निर्णय एमएमआरसीने घेतला आहे. दुसरीकडे पहिल्या टप्प्याच्या संचलनासाठी आवश्यक अशा नऊही गाड्या आरे कारशेडमध्ये दाखल झाल्या आहेत. या गाडया देशी बनावटीच्या असून या चालकमुक्त, स्वयंचलित अशा गाड्या आहेत. मात्र, याखेरीज या गाड्यांची वेगळी आणि महत्त्वाची वैशिष्ट्ये काय आहेत? हे जाणून घेण्याची संधी मुंबईकरांना 'लोकसत्ता शहरभान' उपक्रमाअंतर्गत मिळणार आहे.

एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका आणि मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे या मेट्रो ३ प्रकल्पातील मेट्रो गाड्यांची वैशिष्ट्ये विशद करतील. त्याबरोबरच महत्त्वाकांक्षी अशा सागरी किनारा रस्त्याची वैशिष्ट्येही यावेळी पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त म्हणून अधोरेखित करणार आहेत.

सारस्वत बँक
प्रस्तुत
लोकसत्ता शहरभान
सहप्रायोजक
VEENA WORLD
Travel. Explore. Celebrate Life.
Hiranandani

**मुख्य प्रायोजक**
- सारस्वत को-ऑप. बँक लि.

**सहप्रायोजक**
- वीणा वर्ल्ड
- हिरानंदानी ग्रुप

**काय?** लोकसत्ता शहरभान

**कधी?** ८ नोव्हेंबर, सायंकाळी ६.१५ वाजता

**कुठे?** पवई बँक्वेट हॉल, आयआयटी मुख्य प्रवेशद्वारासमोर, पवई.



'लोकसत्ता शहरभान' उपक्रम पवईतील आयआयटी मुख्य प्रवेशद्वाराजवळील पवई बँक्वेट हॉल येथे बुधवारी, ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.१५ वाजता होणार आहे.

मुंबईतील पहिल्या भूमिगत मेट्रोतून प्रवास करण्याचे मुंबईकरांचे स्वप्न आता लवकरच पूर्ण होईल. डिसेंबरअखेरीस मेट्रो ३ चा आरे ते बीकेसी टप्पा वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. त्या दृष्टीने एमएमआरसी कामाला लागले आहे. त्याचाच भाग म्हणून पहिल्या टप्प्याच्या संचलनासाठीच्या नऊही गाड्या वेळेत मुंबईत आणण्यात अश्विनी भिडे यांचा मोठा वाटा आहे.

या गाड्यांची चाचणीही यशस्वीरीत्या केली जात आहे. 'मेक इन इंडिया' अंतर्गत मेट्रो ३ मार्गिकेतील गाड्यांची बांधणी भारतात करण्यात आली आहे. भारतातल्या कोणत्या राज्यात, कोणत्या शहरात किती गाड्यांची बांधणी केली जात आहे? यासाठी किती खर्च लागणार आहे? सर्व गाड्या कधी मुंबईत येणार? अशा अनेक मुद्द्यांवर या शहरभानमध्ये प्रकाश टाकला जाईल. भविष्यात मेट्रो ३ वर धावणाऱ्या गाड्या या चालकमुक्त (ड्रायव्हरलेस) आहेत हे अनेकांना ज्ञात आहे. मात्र, यासह या गाडीची अन्य काय वैशिष्ट्ये आहेत? गाडी किती वेगाने धावणार? किती डब्यांच्या गाड्या असणार? या गाड्या कशा सुरक्षित आहेत? गाडीत कोणकोणत्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत? याचीही माहिती त्या या वेळी देतील.

लवकरच मेट्रो ३ मार्गिकेवर धावणाऱ्या मेट्रो गाड्या वातानुकूलित आणि स्वयंचलित आहेत. अशा या मेट्रोच्या गाड्या ३५ वर्षे टिकतील, असा दावा करण्यात येत आहे. तेव्हा या गाड्या अधिकाधिक टिकाव्यात यासाठी नेमक्या कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे? या गाड्यांमुळे ३० टक्के विजेची बचत कशी होणार आहे? याचीही माहिती यावेळी उपस्थितांना जाणून घेता येणार आहे.